# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/११/२०१६

**१) सोण्या चांदीच्या दागीणे व चिल्लर रक्कम अज्ञात अरोपीने चोरून नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०७/११/२०१६ चे १०.३० वा. ते दि.८/११/२०१६ चे १२.३० वा.दर. यातील फिर्यादी अनिल जयराम भोंडेकर वय ५० वर्ष रा. आझाद वार्ड तुमसर यांचा महालपे भाउ दिलीप भोंडेकर हे घरी हजर असतांनी कोणीतरी अज्ञात चोराने समोरील दाराचा व मागील दाराचा कोंढा तोडुन आत प्रवेश करून लोंखडी आलमारीत ठेवलेली १ सोण्याची आंगठी, ३ ग्रॅम चांदीच्याा आंगठया २ नग, ५ ग्रॅम चांदीची लक्ष्मीची मुर्ती १.५ ग्रॅम,१,२,५,१० चे असे चिल्लर ७००/रू असा एकुन ७२५०/रू चा माल चोरून नेल्याने व संगनकाचे नुकशान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४,४५७,३८०,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा गोंडगे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**२)राईसमिल गोडाउन मधील सामानाची चोरी :—**

दिनांक ०६/११/२०१६ रोजी ०६०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने राईसमील गोडाउन मधील राईस फिल्टर,राईस फिल्टर बेड, कुकस ब्लेमर,पॉलीस सेटची पुल्ली २ नग, लाखडी एंगल ३ नग, असा एकुन ५३,०००/रू चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४६१,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी खंडाते पो. स्टे. वरठी हे करीत आहेत

**३ अज्ञात वाहण चालकाने मागेहुन येवुन फिर्यादीचे मुंलीना जखमी करण्यास.व दुसरीच्या मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ८/११/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी दिलीप राघोबा उपरीकर वय ५१ वर्ष रा. लाखोरी यांची मुलगी कु. अश्वीनी उपरीकर वय १८ वर्ष हि तीची बहीन शाहीली उपरीकर वय १५ वर्ष व विदया मारोती वडतकर वय १८ वर्ष असे मिळुन तिची जुपीटर मो.सा. क्र. एमएच ३६ ए ५७६९ ने साकोली कडे एनएच ६ रोडने जात असता मागेहुन येणा—या अज्ञात आरोपी वाहण चालकाने आपले ताब्यातील वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मुलीचे मोटार सायकलला मागेहुन धडक मारून पळुन गेला मोटार सायकलवरील तिघ्याही मुली खाली पडुन विदया वडतकर ही जागीच मरण पावली, व अश्वीनी, साहीली यांच्या डोक्याला मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३०४ (अ) भांदवि. सहकलम १८४,१३४,/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी गांवडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४ अज्ञात आरोपीने धानाचे पुजने जाळुन नुकशान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०७/११/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादी बन्सीलाल गेंदलाल कुंभरे वय ४० वर्ष, रा.बाळापुर , तसेच तेजराम गोपाले यांच्या शेतामध्ये रचुन ठेवलेल्या १०१० जातीच्या धानाचे २ पुजने जाळुन १,०२०००/रूयांचे नुकशान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४३५ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा बावने पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

५) सुल्लक कारणावरून कपाळावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक ०५/११/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील फिर्यादी प्रफुल बोरराम नंदेश्वर वय २१ वर्ष, रा. दिघोरी नानोरी हा चौकात पाणठेल्यावर खर्रा घेण्यास गेला असता, तिथे आरोपीने फिर्यादीस. ''भिकारचोट तु खर्रा का घेशील'' असे म्हटल्यावरून फिर्यादीने ''तु चुप रहा बे मि खर्रा घेईन किंवा नाही'' असे बोलला असता, आरोपीने पाणठेल्या जवळील बासाची काठी उचलुन फिर्यादीचे कपाळावर मारून जख्मी केल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी चे रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

५) . अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—

दिनांक ०८/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर ,लाखनी ,कारधा, सिहोरा येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारु कि. १३००/—रू. व १८० लिटर देश दारु कि. १३५०/—रु. व तसेच जुगारातुन कि. १८३/रू असा एकुण कि. १,५३३/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

( बि.आर. गाडे )
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२२८३२१७८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.